नाशिक जिल्हा परिषद, नाशिक.
जा.क्र.ग्राप/योजना/संकलन-३/ २१८ /२०१७
नाशिक दिनांक :- ८ /१२/ २०१७

प्रति,
प्रकल्प अधिकारी, तथा अपर जिल्हाधिकारी,
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प नाशिक

**विषय :- तिर्थक्षेत्र / यात्रास्थळ विकास कार्यक्रमांतर्गत जिल्हा वार्षिक आदिवासी उप योजने अंतर्गत (नाशिक प्रकल्प) प्रशासकिय मान्यता दिलेल्या कामांना मंजुरी मिळणे बाबत. (सन २०१७-२०१८)**

**संदर्भ :-** १) प्रकल्प अधिकारी,तथा अपर जिल्हाधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प नाशिक यांचे कडील आदेश जा.क्र.नियोजन/का.५(१)/आउयो/१६-१७/नियतव्यय/९९८ दिनांक २७/०४/२०१७

२) मा.जिल्हाधिकारी,नाशिक यांचे कडील ३०% कपात बाबतचे पत्र जा.क्र.जिनिस/कक्ष.१२/संस४/१७५/१७ दिनांक ०३/०७/२०१७

३) मा.मु.का.अ.जि.प. नाशिक यांचे कडील मंजुर टिपणी दिनांक

उपरोक्त विषया बाबत व सदर्भिय पत्रान्वये सुचित केले प्रमाणे सन २०१७-२०१८ या वर्षा मध्ये प्राप्त झालेल्या कामांना प्रशासकिय मान्यता देण्यात येत आहे. त्या नुसार नाशिक जिल्हयातील खालील प्रमाणे तालुका निहाय (नाशिक प्रकल्पातील) कामांना प्रशासकिय मान्यता देण्यात आलेली आहे.

| क्र. | तालुका | तिर्थक्षेत्राचे नांव | कामाचे नांव | अंदाजपत्रकिय रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | नाशिक | श्री.गिरजाई माता मंदिर वाडगांव ता. नाशिक | पथदिप बसविणे | ७.५० |
| २ | नाशिक | श्री.भवानी माता मंदिर गणेशगांव ना. ता. नाशिक | पथदिप बसविणे | ७.५० |
| ३ | नाशिक | श्री. दत्त मंदिर गोवर्धन ता. नाशिक | शौचालय बांधणे | १०.०० |
| ४ | नाशिक | श्री.श्रीराम मंदिर व हनुमान मंदिर पिपंळद नाशिक ता. नाशिक | भक्त निवास बांधणे | १०.०० |
| ५ | दिंडोरी | श्री.हनुमान मंदिर वरखेडा ता.दिंडोरी | भक्त निवास बांधणे | १०.०० |
| ६ | दिंडोरी | श्री. हनुमान मंदिर महाजे ता. दिंडोरी | वाहनतळ बांधणे | ८.०० |
| ७ | दिंडोरी | श्री दत्त मंदिर नळवाडी ता. दिंडोरी | मंदिर परिसर रस्ता | १५.०० |
| ८ | दिंडोरी | श्रीक्षेत्र रामशेज आशेवाडी ता. दिंडोरी | वाहनतळ बांधणे | १०.०० |
| ९ | इगतपुरी | सर्वतिर्थ टाकेद ता. इगतपुरी | वाहनतळ बांधणे | १०.०० |
| १० | पेठ | श्री. दत्त मंदिर धनशेत ता. पेठ | भक्त निवास बांधणे | १२.०० |
| ११ | त्र्यंबकेश्वर | श्रीक्षेत्र गडदवणे ता. त्र्यंबकेश्वर | भक्त निवास बांधणे | १०.०० |
| | | | **एकुण** | **११०.००** |
| अक्षरी रुपये एक कोटी दहा लाख मात्र | | | | |

तरी कृपया सदर प्रस्तावास सन २०१७-२०१८ वर्षा करिता मान्यता देणेत येवुन अनुदान उपलब्ध करुन दयावा.

८/१२

**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद, नाशिक.**

सोबत :- सन २०१७-२०१८ या वर्षात प्रशासकिय मान्यता दिलेल्या कामांच्या आदेशाची प्रत.

वाचा :- १) शासन निर्णय क्र.झेडपीए-२०१५/प्र.क्र.१०/वित्त-९ मंत्रालय मुंबई ३२ दि.२५ मार्च,२०१५
२) शासन निर्णय क्र.निविदा-२०१४/प्र.क्र.२६०/पंरा-७/ मंत्रालय मुंबई ३२ दि.२७ मे,२०१५
३) नियोजन विभाग,महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र.डिएपी-१०१६/प्र.क्र.४७/का.१४८१ दि.१८/४/२०१७
४) प्रकल्प अधिकारी,तथा अपर जिल्हाधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प नाशिक यांचे कडील आदेश जा.क्र.नियोजन/का.५(१)/आउयो/१६-१७/नियतव्यय/९९८ दिनांक २७/०४/२०१७
५) मा.जिल्हाधिकारी, नाशिक यांचे कडील ३०% कपात बाबत पत्र जा.क्र.जिनिस/कक्ष.१२/संस-४/१७५/१७ दि.०३/०७/२०१७
६) शासन निर्णय क्र.झेडपीए-२०१६/प्र.क्र.५६/वित्त-९ मंत्रालय मुंबई ३२ दि.०७ ऑक्टोबर,२०१७
७) म.मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.नाशिक यांची मंजुर टिपणी दिनांक ८/१२/२०१७

=====================================================

नाशिक जिल्हा परिषद, नाशिक.
जा.क्रग्राप/योजना/संकलन-३/२२० /१७
नाशिक दिनांक :- ८ /१२ / २०१७

प्रशासकिय मान्यता आदेश
सन २०१७-२०१८

सन २०१७-२०१८ या वर्षा मध्ये ग्रामिण भागातील जिल्हा वार्षिक **आदिवासी उप योजने अंतर्गत तिर्थक्षेत्र / यात्रास्थळांचा विकास** करणेसाठी जिल्हास्तरावरुन प्रशासकिय मान्यता दिलेल्या कामांना मंजुरी मिळणेसाठी नाशिक जिल्यातील तालुका निहाय प्राप्त झालेल्या तिर्थक्षेत्र / यात्रास्थळांच्या प्रस्तावित कामांना संदर्भ क्रमांक ६ मध्ये नमुद केलेल्या अधिकाराचा वापर करुन नाशिक जिल्हयातील गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांनी शिफारस केलेल्या खालील कामास (तिर्थक्षेत्र / यात्रास्थळांचे) अंदाजपत्रकास या आदेशान्वये प्रशासकिय मान्यता देण्यात येत आहे.

**लेखाशिर्ष :- आदिवासी क्षेत्रातील यात्रा स्थळांचा विकास** (नाशिक प्रकल्प)
**मागणी क्रमांक:-टी-५ २५०१** विशेष ग्राम विकास कार्यक्रम पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-०१ एकात्मिककृत ग्राम विकास कार्यक्रम-७९६ जनजाती क्षेत्र उपयोजना (०१)जनजाती क्षेत्र उपयोजनांतर्गत योजना-राज्य योजनांतर्गत योजना (०१)(०२) आदिवासी क्षेत्रातील यात्रास्थळांचा विकास.
**(२५०१ २७४८) ३१ सहाय्यक अनुदान ( वेतनेतर)**

| क्र. | तालुका | तिर्थक्षेत्राचे नांव | कामाचे नांव | अंदाजपत्रकिय रक्कम(लक्ष) |
|---|---|---|---|---|
| १ | नाशिक | श्री.गिरजाई माता मंदिर वाडगांव ता. नाशिक | पथदिप बसविणे | ७.५० |
| २ | नाशिक | श्री.भवानी माता मंदिर गणेशगांव ना. ता. नाशिक | पथदिप बसविणे | ७.५० |
| ३ | नाशिक | श्री. दत्त मंदिर गोवर्धन ता. नाशिक | शौचालय बांधणे | १०.०० |
| ४ | नाशिक | श्री.श्रीराम मंदिर व हनुमान मंदिर पिपंळद नाशिक ता. नाशिक | भक्त निवास बांधणे | १०.०० |
| ५ | दिंडोरी | श्री.हनुमान मंदिर वरखेडा ता.दिंडोरी | भक्त निवास बांधणे | १०.०० |
| ६ | दिंडोरी | श्री. हनुमान मंदिर महाजे ता. दिंडोरी | वाहनतळ बांधणे | ८.०० |
| ७ | दिंडोरी | श्री दत्त मंदिर नळवाडी ता. दिंडोरी | मंदिर परिसर रस्ता | १५.०० |
| ८ | दिंडोरी | श्रीक्षेत्र रामशेज आशेवाडी ता. दिंडोरी | वाहनतळ बांधणे | १०.०० |
| ९ | इगतपुरी | सर्वतिर्थ टाकेद ता. इगतपुरी | वाहनतळ बांधणे | १०.०० |
| १० | पेठ | श्री. दत्त मंदिर धनशेत ता. पेठ | भक्त निवास बांधणे | १२.०० |
| ११ | त्र्यंबकेश्वर | श्रीक्षेत्र गडदवणे ता. त्र्यंबकेश्वर | भक्त निवास बांधणे | १०.०० |
| | | | एकुण | ११०.०० |

उपरोक्त प्रशासकिय मान्यता आदेश हा खालील अटी व शर्तीस अधिन राहुन देण्यात येत आहे.

१) ज्या जागेवर काम मंजुर करण्यात आले आहे त्या जागेमध्ये बदल करु नये. तथापि कामांची जमिनीवर आखणी करण्यापुर्वी (Lineout) सदरची जागा ग्रामपंचायतीच्या मालकीची असल्याची खात्री कार्यावन्वीन तांत्रिक पर्यवेक्षीय यंत्रणेने करावी जागा ग्रामपंचायतच्या मालकीची असेल तरच काम सुरु करता येईल.
२) सदरची कामे ही तिर्थक्षेत्र/यात्रास्थळाच्या विविध सेवा उपलब्ध होण्या करिता करण्यात आली असुन ज्या कामाच्या प्रयोजनार्थ मंजुर करण्यात आली त्यासाठीच वापर करावा.
३) मंजुर कामांची जागा ग्रामपंचायतीकडे निहीत केलेली असल्यास सक्षम प्राधिकारी (उदा.जिल्हाधिकारी) यांची पुर्व परवानगी घेवुनच काम सुरु करावे.
४) सदरचे मंजुर काम हे अंदाजपत्रकात नमुद केले प्रमाणेच करण्यात यावे.
५) यात्रास्थळावरील भाविकांची प्रस्तामध्ये नमुद दैनिक/मासिक व यात्रेच्या काळातील संख्या पडताळणी गट विकास अधिकारी, यांनी करावी व ती योग्य असल्यास पडताळणी दाखला प्राप्त झाले नंतरच कामाची आखणी करण्यात येवुन काम सुरु करावे.
६) यात्रास्थळाच्या निकषांची पुर्तता होत असल्या बाबत खात्री पटल्यानंतरच गट विकास अधिकारी यांनी पडताळणी दाखला द्यावा या नंतरच कार्यारंभ करण्यात यावा.

७) सदरील कामांना सन २०१७-१८ च्या प्राप्त होणा-या अनुदानाच्या मर्यादेतच प्रशासकिय मंजुरी दिलेली असल्याने संबधित कार्यान्वियन यंत्रणांनी पुढील कार्यवाही करावी.

८) सदरील काम पुर्ण झाल्यावर ग्रा.प.ने करुन दिलेल्या ठरावा नुसार सदर कामांच्यादेखभाल दुरुस्तीची जबाबदारी संबधित ग्रामपंचायतीची राहील.

९) सदरचे कामे महाराष्ट्र शासन यांचे कडील शासन निर्णय दिनांक २५ मार्च,२०१५ व दिनांक २७ मे,२०१५ नुसार ई-निविदा कार्यप्रणाली अवलविण्या बाबत जिल्हा परिषद पंचायत समिती व ग्रामपंचायत स्तरावरील बांधकामे व साहित्य खरेदी पुरवठयाची कामे e-Tendering प्रक्रियेतुन करण्या बाबत दक्षता घेणेत यावी. अनुज्ञेय असलेले साहित्य खरेदी करणे प्रकरणी नियमा प्रमाणे प्रशासकिय विभागाकडील मंजुरी घेणे व खरेदी बाबत शासनाच्या विहीत नियमावलीचे पालन करुनच साहित्य खरेदी करावी लागेल.ग्रामपंचायत कार्यान्वीन यंत्रणा असल्यास एक लाखाच्या अधिक एकच साहित्याची खरेदी करीता e-Tender आवश्यक राहील. काम मुदतीत पुर्ण करण्याची जबाबदारी व कामाचा दर्जा हा उत्तम राहील याबाबतची जबाबदारी संबधीत यंत्रणा, शाखा अभियंता, उप अभियंता यांची राहील.

१०)नियोजन विभाग,महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र.डिएपी-१०१६/प्र.क्र.४७/का.१४८१ दि.१८/४/१७ अन्वये ई-निविदा कार्यप्रणाली टाळण्यासाठी मंजुर करण्यात आलेले विकासात्मक कामे, सेवा, वस्तुची खरेदी इत्यादी कामाचे तुकडे पाडण्यात येवु नये अशा सुचना परिपत्रकान्वये देण्यात आलेल्या आहेत. सदरच्या सुचनाची काटेकोर पणे अंमल बजावणी करण्यात बाबतची जबाबदारी संबधीत यंत्रणा,शाखा अभियंता, उप अभियंता यांची राहील.

११) सदरचे मंजुर काम यापुर्वी कुठल्याही योजनेतुन मंजुर झालेले नसले बाबत संबधीत कार्यान्वीन यंत्रणेने खात्री करुन त्यानंतरच मंजुर काम सुरु करणेत यावे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद, नाशिक.**

प्रत :- १) कार्यकारी अभियंता (इवद) क्रमांक १ व २ जिल्हा परिषद, नाशिक.
२) गट विकास अधिकारी, पंचायत समिती- नाशिक,दिंडोरी,इगतपुरी,पेठ, त्र्यंबकेश्वर.
३) उप अभियंता उप विभाग इवद- नाशिक,दिंडोरी,इगतपुरी,पेठ, त्र्यंबकेश्वर.